दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक १८८ वा शुक्रवार दि.१० जानेवारी २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## साडेपाच लाख शेतक-यांना नैसर्गिक आपत्तीसाठी ५३५ कोटींची नुकसान भरपाई !



मुंबई, दि. ९ (प्रतिनिधी)–नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतक–यांना दिलासा देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने अखेर मदत देण्याचा निर्णय घेतला असून राज्यातील ५ लाख ३० हजार ४५ शेतक–यांना ५३५ कोटी ६५ लाख ७४ हजार ८९३ रुपयांची मदत वितरित करण्यात आल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी आज दिली.

राज्यात झालेल्या अतिवृष्टी आणि अवेळी पावसामुळे शेतक–यांचे प्रचंड नुकसान झाले होते पण निवडणूक आचारसंहिता आणि सरकार स्थापना, मंत्रिमंडळ विस्तार आणि खाते वाटप यामुळे शेतक–यांना मदत मिळत नव्हती त्यामुळे शेतक–यांमध्ये रोष निर्माण झाला होता राज्य सरकारने शेतक–यांना मदत जाहीर केली आहे. रक्कम संबधित शेतक–यांच्या आधार संलग्न खात्यावर जमा करण्यात येणार असल्याचे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव–पाटील यांनी सांगितले.

मराठवाड्यातील लातूर जिल्ह्यातील १ लाख ६८ हजार ८९ शेतक–यांना १७८ कोटी ६५ लाख रुपये, परभणी जिल्ह्यातील १ लाख १२ हजार ६४८ शेतक–यांना १२१ कोटी ६४ लाख रुपये, बीड जिल्ह्यातील ३९ हजार ९३ शेतक–यांना ३० कोटी २२ लाख रुपये, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ३ हजार ६१९ शेतक–यांना ३ कोटी २३ लाख, हिंगोली जिल्ह्यातील २ हजार ४०८ शेतक–यांना १ कोटी ६३ लाख रुपये, नांदेड जिल्ह्यातील १ हजार ८८६ शेतक–यांना १ कोटी ५८ लाख ७० रुपये, जालना जिल्ह्यातील १ हजार ५९० शेतक–यांना १ कोटी ५७ लाख रुपये, धाराशिव जिल्ह्यातील ३४२ शेतक–यांना ३२ लाख रुपये मदत दिली जाणार आहे.

पुणे विभागातील कोल्हापूर जिल्ह्यातील ४३ हजार ३२१ शेतक–यांना ३५ कोटी ८७ लाख रुपये, सोलापूर जिल्ह्यातील ३ हजार १३ शेतक–यांना ४ कोटी २५ लाख रुपये, सांगली जिल्ह्यातील ५२२ शेतक–यांना ५२ लाख रुपये, पुणे जिल्ह्यातील ३९० शेतक–यांना ३२ लाख ७४ रुपये आणि सातारा जिल्ह्यातील २७ शेतक–यांना १ लाख रुपये मदतीचा यामध्ये समावेश आहे.

मार्च २०२३ पासून रक्कम प्रलंबित

विविध नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेती पीक नुकसानीपोटी मार्च २०२३ पासून ९ हजार ३०७ कोटी रुपये इतकी रक्कम डीबीटीद्वारे शेतक–यांच्या आधार संलग्न बँक खात्यांमध्ये थेट जमा करण्यात आली आहे.

## कालकथित नामदेव सखाराम हनवते यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने विनम्र अभिवादन





लातुर / प्रतिनिधी :– कालकथित नामदेव सखाराम हनवते यांना महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने विनम्र अभिवादन. कालकथित नामदेव सखाराम हनवते यांचा ९ वा पुण्यस्मरण दिन औसा रोड, सैलानी बाबाच्या पाठीमागे मौजे खोपेगाव ता. लातुर येथील नामदेव हनवते सदन या ठिकाणी विनम्र अभिवादन करण्यात आले. पत्रकार अशोक हनवते यांचे वडील नामदेव सखाराम हनवते यांचे दि.९ जानेवारी २०१६ रोजी निधन झाले होते. दि. ९ जानेवारी २०२५ रोजी त्यांचा ९ वा पुण्यस्मरण दिन साजरा करण्यात आले. यावेळी बौद्धाचार्य कल्याणराव हनवते यांनी विधीवत बुद्ध वंदना घेऊन सर्व प्रथम तथागत भगवान गौतम बुद्ध,बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कालकथित नामदेव सखाराम हनवते यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात केली. यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ जिल्हा शाखा लातूर येथील सर्व पदाधिकारी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे नूतन उपाध्यक्ष अशोक देडे, शहर अध्यक्ष महादेव डोंबे, जिल्हा संघटक सुधाकर फुले, जिल्हा कोषाध्यक्ष अरुण कांबळे, दीपरत्न निलंगेकर जिल्हा प्रतिनिधी दूरदर्शन तथा जिल्हा कार्याध्यक्ष व्हॉइस ऑफ मीडिया , सितम सोनवणे जिल्हाध्यक्ष व्हॉइस मीडिया डिजिटल विंग, बी एल कांबळे शासकीय ग्रंथपाल, के डी गायकवाड सेवानिवृत्त टी एल आर,राजू मस्के गुत्तेदार , प्रवीण सोनवणे, डॉ. श्री शेलम तलारी हनवते परिवारातील लहान थोर बालक बालीका यांनी उपस्थित राहून भावपूर्ण विनम्र अभिवादन करून बाबांनी केलेल्या कार्याचे स्मरण केले.

## युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांना जन्मदिनानिमित्त अनेकांकडून शुभेच्छा





लातूर :– भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव मुख्यमंत्री माजी लाडकी बहीण योजनेचे लातूर ग्रामीण विधानसभा अध्यक्ष ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांना त्यांच्या जन्मदिनानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसह मित्रपरिवार व इतर अनेकांनी यथोचित सत्कार करून केक कापून उज्वल भवितव्या सह दीर्घ आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

आज समाजासाठी नेतृत्व करणारे अनेक आहेत. पण त्यात प्रामाणिक आणि सचोटीने नेतृत्व करणारे फार कमी आहेत. भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव ऋषिकेशदादा कराड यांनी आपल्या कार्यातून असंख्य तरुणांना आपलेसे केले आहे. तरुणांना सहजतेने भेटणारे त्यांच्यामध्येच उठ–बस करणारे, त्यांच्याशी सातत्याने संवाद साधणारे, त्यांच्या समस्या जाणून घेणारे आणि सोडवणूक करणारे अशी प्रतिमा त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वातून सिद्ध केली आहे.

सामाजिक शैक्षणिक क्रीडा आरोग्य यासह विविध क्षेत्राच्या माध्यमातून तरुणांना प्रोत्साहन देणारे, मदत करणारे ऋषिकेशदादा कराड यांच्या माध्यमातून लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात एक सर्वसामान्य युवा नेतृत्व उदयास आले असून तरुण शक्तीच्या जोरावर निश्चितच मतदार संघाची सर्वांगीण प्रगती साधू शकतो हे त्यांनी वेळोवेळी मिळालेल्या संधीच्या माध्यमातून दाखवून दिले आहे.

गेल्या काही दिवसापासून तरुणाईत स्वतःची वेगळी प्रतिमा निर्माण करणारे युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांच्या जन्मदिनानिमित्ताने ०९ जानेवारी गुरुवार रोजी एमआयटीचे अधिकारी, कर्मचारी, विविध संस्थांचे पदाधिकारी, भाजपा कार्यकर्त्यांसह मित्रपरिवार हितचिंतकांनी यथोचित सत्कार करून केक कापून जन्मदिनाच्या शुभेच्छा दिल्या. सकाळपासून आ. रमेश आप्पा कराड यांच्या संवाद संपर्क कार्यालयात शुभेच्छा देण्यासाठी अनेकांनी गर्दी केली होती.

यावेळी भाजपाचे बन्सी भिसे, प्रताप पाटील, अमर चव्हाण, संजय ठाकूर, वसंत करमुडे, सुरज शिंदे, डॉ बाबासाहेब घुले, विजय गंभीरे, भाऊसाहेब गुळबिले, संभाजी वायाळ, अशोक सावंत, चंद्रकांत कातळे, अभिजीत मद्दे, विजय चव्हाण, दत्ता आंबेकर, उत्तम पवार, श्रीनिवास उगिले, सुरेश बुड्डे, हनुमंत गव्हाणे, अविनाश रणदिवे, आकाश काळे, आत्माराम जाधव, शरद शिंदे, आदिनाथ मुळे, शुभम खोसे, भागवत गीते, अभिमान वायबसे, प्रशांत रायनूळे, राजकुमार मानमोडे, रमा चव्हाण, बालाजी गवळी, ओम चव्हाण, विनोद आडगळे, किरण मुंडे, सचिन लटपटे, सुरेश सूर्यवंशी प्रशांत शिंदे, ओम भिसे, लक्ष्मण खलंग्रे, भूजंग काळदाते, दिलीप पाटील, संजय सूर्यवंशी, गोविंद नांदे, विष्णू भोसले, राज जाधव, मुकुंद केसरे, गणेश सुरवसे, विठ्ठल डोंगरे, अजय भताने, प्रशांत डोंगरे, प्रशांत सोट, शाम भोळे, संजय सावंत, राम भताने, उद्धव केदार, खंडू सुरवसे यांच्यासह भाजपा सह युवा मोर्चाचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोटरीच्या चित्रकला स्पर्धेचे बक्षिस वितरण



लातूर /प्रतिनिधी: रोटरी क्लब ऑफ मिडटाऊनच्या वतीने घेण्यात आलेल्या भव्य चित्रकला स्पर्धाचे बक्षीस वितरण डॉ.बाबासाहेब आंबेडकर पार्क येथे आयोजित कार्यक्रमात संपन्न झाले.

या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणुन चित्रकला महाविद्यालयाचे प्राचार्य अविनाश सातपुते, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी एस.व्ही. क्षिरसागर,माजी प्रांतपाल डॉ. हरिप्रसाद सोमानी हे उपस्थित होते.

डिसेंबर महिन्यात झालेल्या या स्पर्धेत शहर व जिल्ह्यातील १५० शाळांनी सहभाग नोंदवला होता.साडेतीन हजार विद्यार्थ्यांनी स्पर्धेत चित्रे रेखाटली.यातील विजेत्यांना प्रायोजक कुणाल सायकल वर्ल्ड यांच्या मार्फत एकूण १२ सायकली बक्षीस म्हणून दिल्या गेल्या.त्यात पहिली ते दहावीच्या वर्गासाठी प्रत्येकी एक व मूकबधिर विद्यार्थ्यांसाठी दोन सायकल देण्यात आल्या.

यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षण हेच जीवनात अंतिम नाही,ते गरजेचे तर आहेच पण ५९ कलापैकी एखादी कला करा असे प्रतिपादन माजी पंतप्रधान डॉ.हरिप्रसाद सोमाणी अध्यक्षीय समारोप करताना केले.

चित्रकलेमध्ये पुढे जाऊन करिअरच्या वेगवेगळ्या क्षेत्रातील व्यावसायिक संधी याबद्दल प्राचार्य अविनाश सातपुते यांनी मार्गदर्शन केले.एस.व्ही. क्षीरसागर यांनी विद्यार्थ्यांमध्ये क्रमांकासाठी स्पर्धा न घेता त्यांच्या कौशल्याचे मूल्यमापन करून त्यामध्ये सुधारणा कशी करावी याबद्दल मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी,पालक कलाशिक्षक व विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित राहिल्याबद्दल प्रोजेक्ट चेअरमन रमेश चिल्ले यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सचिन मालु यांनी केले. क्लबचे अध्यक्ष चेतन पंढरीकर, सचिव गिरीश पेन्सलवार, श्रद्धानंद आपशेट्टी, जगदीश कुलकर्णी, अमोल दाडगे ,सतीश कडेल,पवन मालपाणी,कलश मुंदडा,अनुप देवणीकर,श्रवण बियाणी,मनोज सुर्यवंशी, किशोर दाताळ,पवन मालपाणी,प्रशांत भाटगावे, ओमप्रकाश झुरुळे,योगेश काळे, गोविंद कुंचमवार, मोतीलाल वर्मा, गणेश सावंत, विरेंद्र पुंडीपल्ले,राजेश दायमा,विकास बारोळे, लक्ष्मीकांत अग्रोया,अविनाश भोसले,विशाल इटकर, व इतर सदस्य मोठ्या संख्येत उपस्थित होते. एकूण ५६ विजेत्या मुलांना बक्षिसे व सायकलीचे वाटप करण्यात आले. विजेत्या स्पर्धकांच्या चित्रांची आर्ट गॅलरीही सभास्थळी सजविण्यात आली होती.

## कर संकलन विभागाची दमदार कामगिरी जानेवारी पर्यंतच ५० कोटी चे कर संकलन

लातूर/प्रतिनिधी : कर संकलन व कर आकारणी विभाग लातूर शहर महानगरपालिका यांच्या वतीने सन २०२४–२५ या वर्षाच्या सुरूवातीपासूनच १००% मालमत्ता कर वसुलीचे लक्ष्य ठेवून मालमत्ताधारकासाठी विविध उपक्रम राबविण्याचे निर्देश आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे यांनी प्रशासनास दिलेले होते. त्यानुसार वेळोवेळी विविध प्रकारचे सुटची व शास्ती माफीची योजना लागू करण्यात आली होती. तसेच लोक अदालत मधे सुद्धा प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यानंतर ही काही थकबाकीदार टैक्स भरत नसल्याचे निदर्शास आल्याने जप्ती, नळ खंडन आदी कार्यवाही करण्यात आले होते.. परंतु पुन्हा एकदा शास्ती माफी लागू करावी असी मागणी आल्याने या वर्षातील शेवटची संधी म्हणून दिं.२५ डिसेंबर ते १० जानेवारी २०२५ पर्यंत व्याज/ शास्तीमध्ये ७५ टक्के सुट देण्याचा निर्णय मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी जाहीर केला आहे. या आर्थिक वर्षात ३५ हजार मालमत्ता धारकाकडून ५० कोटी चे कर संकलन हे अवघ्या काही महिन्यात करुन कर संलकन विभागातील वसुली लिपिक, पर्यवेक्षक, कर अधीक्षक, क्षेत्रीय अधिकारी यांनी दमदार कामगिरी केली आहे. तसेच ७५% शास्ती माफी दरम्यान मालमत्ताधारकांना कर भरणा करणे सुलभ व्हावे यादृष्टीकोणातून महानगरपालिकेमार्फत दिं.०९ व १० जानेवारी २०२५ रोजी शहराच्या विविध प्रभागात मालमत्ताकर वसूली कॅम्पचे आयोजन करण्यात आले आहे. सदरील कॅम्प च्या पहिल्याच दिवशी एकूण ६० लक्ष चे कर वसुली झाली असून, उद्या ७५% शास्ती माफी चा शेवटचा दिवस असून यानंतर पुन्हा सुट लागू होणार नाही व धडक जप्ती मोहीम सुरु होणार आहे. तरी उर्वरित थकबाकीदार मालमत्ता धारकाणी सुट चा लाभ घेऊन टॅक्स भरुन शहर विकासात हातभार लावावा व जप्ती सारखी कटू कार्यवाही टाळावी असे आव्हान उपायुक्त डॉ पंजाब खानसोळे यांनी केले आहे .

## संपादकीय....

### एकांगी कुटूंब पद्धती

दैनंदिन जीवन जगण्यासाठी पूर्वी संयुक्त कुटुंब पद्धतीचा विचार अमलात येत होता; परंतु कालांतराने बदल होत गेले. लोकसंख्या वाढत गेली आणि कुटुंबातील सदस्यांमध्ये संपत्तीची विभागणी होऊन या कुटुंब पद्धतीचा रूपांतर विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये कधी होऊन गेलं हे काळाच्या ओघात कळलंच नाही. आज कुटुंबामध्ये आपणाला आजी–आजोबा फार कमी प्रमाणामध्ये दिसत आहेत. त्याचा परिणाम स्वार्थी कुटुंबातील सदस्य बनण्यासाठी झालेला दिसून येत आहे. आज प्रत्येक कुटुंबामध्ये प्रत्येक सदस्यांच्या गरजा ह्या फार मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेल्या आहेत. माणूस पैसे कमावण्याच्या, संपत्ती जमवण्याच्या आणि त्यातून समाजामध्ये प्रतिष्ठा मिळविण्यासाठी केविलवाणा प्रयत्न करताना दिसू लागला आहे. परंतु हे करत असताना कुटुंबातल्या प्रत्येक सदस्याची स्वार्थी भावना त्या ठिकाणी वाढताना दिसत आहे.

पूर्वी कुटुंबाकर्ता हा योग्य दिशा देणारा, योग्य निर्णय घेणारा आणि सर्वांसाठी आदरणीय व्यक्ती म्हणून प्रत्येकाच्या मनामध्ये आदरणीय असायचा. अलीकडे कुटुंबाकरता ही बाब कुठेतरी फार कमी प्रमाणामध्ये दिसून येत आहे. याचं कारण म्हणजे विभक्त कुटुंब पद्धती असलेले तीन किंवा चार सदस्य यापैकी आई–वडील आणि एक किंवा दोन मुले. या सदस्यांमधून कोणाचे वडील कमावते असतील, कोणाचे आई आणि वडील कमावते असतील. अशा कुटुंबामध्ये आपणाला असंच चित्र दिसून येतं की ज्याच्या घरामध्ये फक्त वडील कमावते आहेत त्या वडिलांची किंमत ठराविक वयापर्यंत बर्या प्रमाणात चांगली असते.

परंतु विशिष्ट वयानंतर त्या कमवत्या पुरुषाची अवस्था त्या कुटुंबामध्ये अत्यंत दयनीय दृष्टिकोनातून आज होत आहे. ते कशामुळे तर कमावत्या पुरुषाबाबत महिन्याचा पगार झाल्यानंतर प्रत्येक सदस्याच्या गरजा पूर्ण केल्यानंतर त्या घरातील सदस्याकडून अर्थात त्या पुरुषाची पत्नी आणि मुले मुली यांच्याकडून त्यांना म्हणावे तेवढे स्थान मनामध्ये दिले जात नाही. प्रत्यक्ष घरामध्ये वागतानासुद्धा ते आपणाला दिसून येते. हे बहुतांशी घरांमधील वास्तव चित्र आहे.

अशा परिस्थितीमुळे घरामधील सदस्यांचा सुसंवाद राहिलेला नाही. घरामधील सदस्य फक्त प्रत्येकाकडे स्वार्थी भावनेच्या दृष्टिकोनातून आपलं नातं टिकवण्याचा प्रयत्न करतायेत. त्यामुळे पूर्वी आजी–आजोबांच्या माध्यमातून मिळणारी संस्काराची शिदोरी आज मुला–मुलींना, सुना–बाळांना मिळतच नाही आणि भविष्यात मार्गक्रमण करत असताना भूतकाळात काय झालं वर्तमानात काय होतंय आणि भविष्यात काय करायचे याची सांगड त्या कुटुंबामध्ये कोणीही घालायला तयार नाही. त्यासाठी कोणालाही वेळ नाही. ही बाब तर प्रकर्षाने आपणाला ज्या कुटुंबामध्ये आई आणि वडील अर्थात पुरुष आणि महिला दोघेही कमावते असतील, तर त्या ठिकाणी मुले–मुली आणि आई–वडिलांचा संबंध हा फक्त सुट्टीच्या दिवशीच येतो. त्या सुट्टी दिवशी त्या सर्वांमध्ये किती वेळ सुसंवाद होत असेल, विचारांची देवाणघेवाण होत असेल, संस्काराचे बाळकडू दिले जात असतील त्यावर मात्र सध्या प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

या परिस्थितीमध्ये अत्यंत महत्त्वाची भूमिका आईने निभावली पाहिजे. कारण आई हाच कुटुंबाचा अत्यंत महत्त्वाचा खांब असतो. त्या खांबामध्येच जर कुठेतरी बाधा असेल तर हे संस्काररूपी उभे राहणारं घराचं छत टिकेल का, याचा विचार करण्याची वेळ आलेली आहे. जर स्वतःच्या कमावत्या पतीबरोबर पत्नीकडून सन्मानजनक वागणूक मुलामुलींसमोर मिळत नसेल किंवा कमावते पती–पत्नी यांच्यामध्येसुद्धा एकमेकांविषयीचा सन्मान आणि सुसंवाद नसेल, तर अशा परिस्थितीमध्ये त्या घरातील मुलांसमोर काय चित्र दिसतंय याच्यावर विचार करण्याची वेळ आली.

आई–वडील दोघेही कमावते असतील तर त्या दोघांमध्ये कुठेतरी अहंपणा भरलेला असल्यास त्या दोघांमध्ये सन्मान आणि सुसंवाद राहू शकत नाही. त्यामुळे घरातील प्रत्येक सदस्य एकमेकांशी फक्त त्यांच्या गरजेपुरत्या स्वार्थी भावनेतून नातं जोडताना प्राधान्य देतात. त्यामुळे आत्ताच्या विभक्त कुटुंब पद्धतीच्या जागी भविष्यात एकांगी कुटुंब पद्धती यायला वेळ लागणार नाही. म्हणून सध्याच्या आई–वडिलांनी लक्षात घेतलं पाहिजे की, आपल्या स्वतःच्या आई–वडिलांची अर्थात आजी–आजोबांची कुटुंबाबद्दलची आणि कुटुंबातल्या सदस्यांबद्दलची जी काही मानसिकता होती, जे काही आपणाला संस्कार आपल्याला त्यांनी दिले, जे काही बाळकडू दिले ते आठवा आणि आज ते आपल्या मुलांना देत आहोत का हा विचार करा.

एक लक्षात घ्या आपल्या शेतीप्रधान देशामध्ये अधिक लोक खेड्यात राहतात. त्यांचा मुख्य व्यवसाय शेती आणि शेतमजुरी हा आहे. खेडेगावात आजही बर्यापैकी सहकुटुंब पद्धत दिसून येते. मात्र शहरात आज विभक्त कुटुंब पद्धतीमुळे चित्र बदललेले दिसते. फक्त १ ते १० तारखेपर्यंत अर्थात पगार होईपर्यंत सर्व सदस्य त्या कमावत्याच्या बाजूने असतात. त्याच्याशी छान बोलण्याचा प्रयत्न करतात आणि त्यांच्या एकदा ज्या काही गरजा आहेत त्या पूर्ण केल्या की हळूहळू त्यांचं वागणं–बोलणं बदलत जाते. म्हणून या विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये प्रत्येक सदस्यांमध्ये सुसंवाद असला पाहिजे. स्वार्थी भावना वाढीस लागली नाही पाहिजे. ज्या गरजा आहेत त्या कशा पूर्ण करता येतील याचा विचार प्रत्येक सदस्यांना केला पाहिजे. घरातील आईवडील दोघेही कमावते असतील तर सुसंवाद, विश्वास, एकमेकाला दिला जाणारा सन्मान या सगळ्या गोष्टी वाढल्या पाहिजे.

अनेक कुटुंबामध्ये तरुण मुलं मुली लग्नाच्या बाबतीत नकारात्मक दृष्टिकोनातून विचार करू लागलेले आहेत. या महत्त्वाच्या विषयावर समाजामध्ये विचारमंथन झालं पाहिजे. त्यावर वैचारिक सुसंवाद करण्यासाठी समाजघटकांनी पुढे आलं पाहिजे आणि कमीत कमी या विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये सुसंवाद कसा वाढेल, प्रत्येक सदस्याची स्वार्थी भावना कशी कमी होईल, प्रत्येकाने आपल्या गरजा ह्या कमीत कमी कशा पूर्ण करता येतील याकडे लक्ष दिलं गेलं पाहिजे.

# वाढते चेंगराचेंगरीचे प्रकार अत्यंत चिंताजनक.

आंध्रप्रदेशातील प्रसिद्ध तिरूपती बालाजी मंदिराजवळ वैकुंठ व्दार दर्शनाच्या टोकन वितरण केंद्रावर झालेल्या चेंगराचेंगरीत बुधवार दिनांक ८ जानेवारी २०२५ ला ६ जणांचा मृत्यू झाला तर ४० हुन अधिक गंभीर जखमी झाले.ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.टोकन वितरण केंद्र सकाळी ५ वाजता उघडण्याचे नियोजन होते.यासाठी भाविक रांगा लावू लागले व प्रचंड गर्दी झाली होती.विविध केंद्रावर सुमारे ४००० हजारहून अधिक भाविक रांगेत उभे असल्याचे सांगितले जाते व चेंगराचेंगरीमुळे मोठा गोंधळ उडाला आणि त्यात एका महिलेचा प्रथम मृत्यू झाला व नंतर गंभीर जखमी झालेल्या ५ भाविकांचा मृत्यू झाला अशाप्रकारे ६ भाविकांना चेंगराचेंगरीत आपले प्राण गमवावे लागले. देशात दरवर्षी अनेक ठिकाणी मंदिर परिसर, प्रवचन परिसर, किर्तन परिसर, गर्दीचे ठिकाण,रेल्वे स्टेशन किंवा अन्य ठिकाणी चेंगराचेंगरीचे प्रकार होतांना दिसतात व यामुळे मोठ्या प्रमाणात जीवितहानी सुध्दा झालेली आहे आणि याचे जिवंत उदाहरण आपल्याला आंध्रप्रदेशातील तिरूपती बालाजी मंदिराजवळ दिसून आले. चेंगराचेंगरीचे प्रकार का होतात याला मुख्य जबाबदार कोण याचाही विचार आपण सर्वसामान्यांनी, मंदिर प्रशासनाने व स्थानिक प्रशासनाने केला पाहिजे. कारण भाविकांनी भीड करायची व मंदिर प्रशासनाने याकडे दुर्लक्ष करायचे त्याचे प्रयचित्य भाविकांनी भोगायचे अशी परिस्थिती आज चेंगराचेंगरीच्या प्रकारात दिसून येते म्हणजेच आ बैल मुझे मुझे मार अशी परिस्थिती झालेली आहे.भारतातील चेंगराचेंगरीच्या अनेक भयावह घटना झालेल्या आहेत यामध्ये ५ मार्च २०१० ला उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला.भारतात बऱ्याच ठिकाणी अपुऱ्या आणि पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे असुरक्षितता असते. अनेकदा दुर्गम ग्रामीण भागात, डोंगराळ प्रदेशात, टेकड्यांवर किंवा योग्य मार्ग नसलेल्या नदीकाठावर धार्मिक कार्यक्रमाचं आयोजन केले जाते. अशा ठिकाणी असलेला तीव्र उतार, स्थळाची असमान भूरचना,अरुंद मार्ग, एकाच ठिकाणी भाविक एकत्रित येणे या कारणांमुळे धार्मिक कार्यक्रमामध्ये मोठे धोके निर्माण होतात. त्यातून चेंगराचेंगरीच्या घटना घडतात.धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम घेताना व्यवस्थापन याकडे दुर्लक्ष करते व दुर्घटना उद्भवतात. इंटरनॅशनल जर्नल ऑफ डिझास्टर रिस्क रिडक्शननं (आयजेडीआरआर)ने प्रकाशित केलेल्या २०१३ च्या अभ्यासात असं दिसून आलं की, भारतातील ७९ टक्के चेंगराचेंगरीचे ठिकाणे हे धार्मिक मेळावे आणि तीर्थयात्रेची ठिकाणे आहेत. विकसित देशांमध्ये बहुतेक चेंगराचेंगरी स्टेडियम, संगीत मैफिली आणि नाईट क्लबच्या ठिकाणी होतात. परंतु भारत आणि इतर विकसनशील देशांमध्ये गर्दीच्या आणि चेंगराचेंगरीच्या बहुतेक दुर्घटना धार्मिक स्थळांवर होतात, असे केरळ सरकारच्या भू आणि आपत्ती व्यवस्थापन संस्थेचे सहाय्यक प्राध्यापक फैसल टी. इलियास यांनी सांगितले. ४ जुलै २०२४ उत्तर प्रदेशातील हाथरस येथे एका धार्मिक कार्यक्रमात चेंगराचेंगरी होऊन किमान २७ जणांचा मृत्यू झाला,१७ फेब्रुवारी २०२४ उत्तर प्रदेशातील मथुरा येथील पूजनीय श्रीजी मंदिरात होळीपूर्वी झालेल्या कार्यक्रमादरम्यान चेंगराचेंगरीत किमान सहा भाविक बेशुद्ध पडले तर काही जण जखमी झाले,२४ डिसेंबर २०२३ मथुरा येथील बांके बिहारी मंदिरात गर्दीमुळे गुदमरून दोन महिला भाविकांचा मृत्यू झाला,१ जानेवारी २०२२ जम्मू आणि काश्मीरमधील प्रसिद्ध माता वैष्णोदेवी मंदिरात भाविकांच्या प्रचंड गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीत १२ जणांचा मृत्यू झाला तर अनेक जण जखमी झाले,२१ एप्रिल २०१९ तामिळनाडूच्या त्रिची येथील मंदिर उत्सवात चेंगराचेंगरीत सात जणांचा मृत्यू झाला,१० ऑगस्ट २०१५ झारखंडमधील देवघर शहरातील एका मंदिरात चेंगराचेंगरीत किमान ११ जणांचा मृत्यू आणि ५० जण जखमी झाले,१४ सप्टेंबर २०१४ आंध्र प्रदेशातील राजमुंद्री येथे 'पुष्करम' उत्सवाच्या उद्धाटनाच्या दिवशी भाविकांची मोठी गर्दी जमली होती गोदावरी नदीच्या काठावरील एका प्रमुख स्नानस्थळावर चेंगराचेंगरीत २७ यात्रेकरूंचा मृत्यू आणि २० जण जखमी झाले,२५ ऑगस्ट २०२४ ला मध्यप्रदेशातील सतना जिल्ह्यातील एका मंदिरात अफवेमुळे चेंगराचेंगरी झाल्यानं दहा यात्रेकरू ठार आणि २० हून अधिक जखमी झाले,१३ऑक्टोबर २०१३ मध्यप्रदेशातील दातिया येथील रतनगढ मंदिराजवळ चेंगराचेंगरीत ८९ जणांचा मृत्यू आणि १०० हून अधिक जखमी झाले,१४जानेवारी २०११ केरळमधील सबरीमाला मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत १०६ यात्रेकरू ठार तर १०० हून अधिक जखमी झाले,४ मार्च २०१० उत्तर प्रदेशातील प्रतापगड येथील राम जानकी मंदिरात झालेल्या चेंगराचेंगरीत ६३ जणांचा मृत्यू झाला, ३०सप्टेंबर २००८ राजस्थानमधील जोधपूरमधील मेहरानगड किल्ल्याच्या परिसरात असलेल्या चामुंडा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत २४४ लोकांचा गुदमरून मृत्यू झाला,३ ऑगस्ट २००६ हिमाचल प्रदेशातील नैना देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सुमारे १५० भाविकांचा मृत्यू आणि ४०० हून अधिक जखमी झाले,२६ जानेवारी २००५ ला पश्चिम महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील वाई जवळील मंदेर देवी मंदिरात वायरिंगमध्ये शॉर्ट सर्किटमुळे ठिणग्या निघाल्यानं घाबरलेल्या हजारो भाविकांनी गर्दी केली होती. मंदिराकडे जाणाऱ्या अरुंद मार्गावर गर्दी झाल्यानं चेंगराचेंगरी झाली लोक एकमेकांवर पडल्याने २९१ जणांचा मृत्यू झाला तर २०० हून अधिक जण जखमी झाले,२७ ऑगस्ट २००३ नाशिक कुंभातील पवित्र स्नानादरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीत ३९ जणांचा मृत्यू झाला तर १४०जण जखमी झाले.चेंगराचेगरीच्या भयावह घटना पहाता त्या टाळण्यासाठी मंदिर प्रशासनाने गांभीर्याने लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.त्याचप्रमाणे सर्वसामान्यांनी किंवा भाविकांनी गर्दीचे गांभीर्य लक्षात घेऊन त्याठिकाणी आपण जावे की नाही याचा गंभीरतेने विचार करूनच गेले पाहिजे. मंदिर परिसरातील वाढत्या चेंगराचेंगरीच्या घटना पहाता मंदिर प्रशासनावर राज्य सरकारने व केंद्र सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे व त्यांच्या चुका उघड करून कारवाई करून त्यात सुधारणा करण्याची आज गरज आहे.यामुळे दुर्घटना टाळण्यास मदत होईल व जीवितहानी टाळता येईल.

-------------------


लेखक


रमेश कृष्णराव लांजेवार

(माजी विद्यापीठ प्रतिनिधी, नागपूर)

मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.


# योजना फक्त कागदावरच

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर राज्यातील सर्व प्रशासकीय अधिकार्यांशी संवाद साधताना राज्यातील सामान्य नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी एक 'सात कलमी' कार्यक्रम निश्चित करून दिला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने काही वर्षांपूर्वी 'इज ऑफ डुइंग बिझनेस' ही संकल्पना आणली होती. त्याच आधारे महाराष्ट्रात 'इज ऑफ लिव्हिंग' या संकल्पनेच्या आधारे राज्यातील सामान्य नागरिकांचे जीवन सुकर व्हावे यासाठी मुख्यमंत्र्यांनी राज्यातील प्रशासनाला ही सुशासनाची सप्तपदी आखून दिली आहे. या सप्तपदीतील किंवा या सात कलमी कार्यक्रमातील अनेक कलमे जरी सर्वसाधारण आणि खूपच प्राथमिक या गटात मोडणारी असली, तरी राज्यात अद्यापही या विषयावर चर्चा करावी लागत आहे हा विषय या निमित्ताने समोर आला आहे. उदाहरणार्थ, शासकीय कार्यांमध्ये स्वच्छता ठेवा आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी स्वच्छ पेयजलाची व्यवस्था करा, अशा प्रकारच्या सूचना आजही मुख्यमंत्र्यांकडून प्रशासकीय अधिकार्यांना दिल्या जात आहेत हे महत्त्वाचे आहे.



विविध कामांसाठी शासकीय कार्यालयात खेटा मारणार्या लोकांचा बराच काळ या कार्यालयातच व्यतीत होत असतो. पण या काळामध्ये त्यांच्यासाठी योग्य स्वच्छतागृहांची किंवा स्वच्छ पाण्याची व्यवस्था नसते हे एक उघड सत्य आहे. नागरिकांची कामे करणार्या अधिकार्यांसाठी वातानुकूलित कार्यालयात बाटलीबंद स्वच्छ पाण्याची आणि स्वच्छ स्वच्छतागृहांची सोय जरी केली जात असली, तरी ज्या लोकांसाठी हे अधिकारी आहेत त्या सर्वसामान्य नागरिकांसाठी मात्र या सोयी उपलब्ध करून देण्याकडे दुर्लक्ष झाले आहे. आजही विविध शासकीय कार्यालयांमधील स्वच्छतागृहे, पाण्याची व्यवस्था किंवा जर बहूमजली इमारत असेल तर लिफ्टची व्यवस्था नादुरुस्त असते हे सत्यही नाकारता येत नाही. शासकीय कार्यालयात ज्या कामासाठी एखादी सामान्य व्यक्ती येते ते काम त्याला सहजपणे पूर्ण करता यावे अशी व्यवस्था शासकीय कार्यालयामध्ये निर्माण व्हायला हवी अशी अपेक्षा या निमित्ताने मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली आहे.

तरी शेवटी नोकरशाहीच्या माध्यमातून हा सात कलमी कार्यक्रम कशा प्रकारे राबवण्यात येणार आहे यावरच या योजनेचे यश अवलंबून राहणार आहे. मुख्यमंत्र्यांनी या कार्यक्रमांमध्ये ज्या सूचना केल्या आहेत त्यामध्ये सरकारी कार्यालयांच्या वेबसाइट अद्ययावत करा अशी एक सूचना आहे. डिजिटल इंडियामध्ये अनेक सरकारी कार्यालय किंवा सरकारी उपक्रम यांच्या वेबसाइट व्यवस्थित चालत नाहीत असाच आजवरचा अनुभव आहे. वेबसाइटवर जी माहिती उपलब्ध व्हायला हवी ती योग्य प्रकारे उपलब्ध होत नसल्यामुळेच सर्वसामान्य नागरिकांना शासकीय कार्यालयांचे खेटे मारावे लागतात. राज्यातील सर्व विभाग आणि कार्यालयांची संकेतस्थळं जर तातडीने अपडेट करण्यात आली आणि सर्वसामान्य नागरिकांना ती वापरता येतील अशा प्रकारे सोपी करण्यात आली तर शासकीय कार्यालयांमध्ये न जातासुद्धा सामान्य नागरिकांना कामे करणे सोपे जाणार आहे.

गाव किंवा शहर पातळीवर नागरिकांची कामे व्यवस्थित होत नसल्यामुळेच या नागरिकांना मंत्रालयाचा दरवाजाही ठोठावा लागतो. त्यामुळे मंत्रालयातील गर्दीही वाढत आहे. ही गर्दी जर कमी करायची असेल तर गाव आणि शहर पातळीवर शासकीय कार्यालयांमध्ये सर्वसामान्य नागरिकांची कामे वेळेत आणि व्यवस्थित पूर्ण होण्याची गरज आहे हे लक्षात घेऊनच मुख्यमंत्र्यांनी हा सात कलमी कार्यक्रम समोर ठेवला आहे. मुख्यमंत्र्यांनी गेल्याच आठवड्यात आपल्या मंत्रिमंडळातील मंत्र्यांनासुद्धा शंभर दिवसाच्या कामाचा आराखडा करण्याचा आदेश दिला आहे. या रोड मॅपप्रमाणे नोकरशाहीने काम करावे आणि प्राधान्यक्रम ठरवून सामान्य नागरिकांची महत्त्वाची कामे मार्गी लावावीत अशी मुख्यमंत्र्यांची अपेक्षा आहे. या देशातील केंद्रीय पातळीवर किंवा इतर कोणत्याही राज्याच्या पातळीवर जेव्हा एखादी योजना आखली जाते तेव्हा ती कागदावर नेहमीच आदर्श असते.

पण अंमलबजावणी पातळीवर मात्र अनेक समस्या निर्माण होतात; पण आता या सात कलमी शासनाच्या योजनेबाबत मात्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः लक्ष घालून या कलमांचे काटेकोर पालन होईल हे बघण्याची गरज आहे. ज्या प्रकारे मंत्रिमंडळातील सर्व मंत्र्यांचे प्रगती पुस्तक दर ठराविक कालावधीनंतर तपासले जाणार आहे त्याच प्रकारे नोकरशाहीची कार्यक्षमता तपासण्याचे कामही करावे लागणार आहे. सरकारने एखादा निर्णय घेतला तर त्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नोकरशाहीवरच असते. आजपर्यंतच्या लालफितीच्या आणि भ्रष्टाचारी कारभाराचा अनुभव असणार्या नोकरशाहीला आता अशा प्रकारचे नवे बदल स्वीकारणे अवघडच जाणार आहे. म्हणूनच सरकारने ठरवून दिलेल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी नोकरशाहीकडून कशा प्रकारे आणि किती कार्यक्षमतेने केले जाते याचेही ऑडिट ठराविक कालावधीनंतर करून घेण्याची गरज आहे.

सरकारी काम आणि सहा महिने थांब ही अनेक वर्षांपूर्वी प्रचलित झालेली म्हण जर अजूनही वापरली जात असेल, तर सरकारी कार्यालयीन पातळीवर कार्यक्षमतेबाबत बरीच मोठी गडबड आहे हेसुद्धा मान्य करावे लागते. सरकारच्या अनेक चांगल्या योजना केवळ नोकरशाहीच्या निरुत्साहीपणामुळे आणि नाराजीमुळे यशस्वी होऊ शकत नाहीत, असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. या सात कलमी सुशासन योजनेबाबत तसे काही होणार नाही याची खबरदारी सरकारला घ्यावीच लागणार आहे. सध्या कोणत्याही खासगी उपक्रमामध्ये किंवा कंपनीमध्ये सर्वसामान्य ग्राहकाचे ज्या प्रकारे स्वागत केले जाते आणि ज्या कार्यक्षमतेची सेवा त्याला दिली जाते तशीच कार्यक्षमता तशीच सेवा जोपर्यंत सरकारी कार्यालयात सर्वसामान्य नागरिकाला उपलब्ध होणार नाही तोपर्यंत हे चित्र बदलण्याची शक्यता कमीच आहे.

# ब्लॅक कॉफी पिण्याशिवाय राहू शकत नसाल, तर व्हा सावध! जास्त पिण्याने होईल असे काही की

ब्लॅक कॉफीचे सेवन मर्यादित प्रमाणात केले तर ते आरोग्यासाठी फायदेशीर आहे. तथापि, जास्त ब्लॅक कॉफी पिण्याचे अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. तुम्हीही ब्लॅक कॉफी पित असाल तर जाणून घ्या आणि वेळीच व्हा सावध

भारतात कॉफी पिण्याचा ट्रेंड झपाट्याने वाढत आहे. करोडो लोक त्यांचा दिवस कॉफीने सुरू करतात. कॉफीचे अनेक प्रकार आहेत, त्यापैकी ब्लॅक कॉफी सर्वात फायदेशीर मानली जाते. ते पिण्याचे अनेक आरोग्य फायदे आहेत आणि म्हणूनच, बरेच लोक दिवसभरात अनेक कप ब्लॅक कॉफी पितात. त्यात कॅलरीज कमी आणि कॅफिन जास्त असते. त्यात अँटीऑक्सिडंट्स देखील असतात, परंतु या कॉफीचे जास्त सेवन शरीराला हानी पोहोचवू शकते. त्याचे काही दुष्परिणाम जाणून तुम्हाला आश्चर्य वाटेल.



टीओआयच्या अहवालानुसार, ब्लॅक कॉफीच्या आम्लयुक्त स्वभावामुळे पोटाच्या आतील आवरणाला नुकसान होऊ शकते, ज्यामुळे पचनक्रियेच्या समस्या उद्भवू शकतात. रिकाम्या पोटी कॉफी पिण्याने ॲसिड रिफ्लक्स, छातीत जळजळ आणि अपचन यासारख्या समस्या उद्भवू शकतात. कॅफिन आणि आम्लयुक्त घटक पोटात असलेल्या आम्लाचे प्रमाण वाढवू शकतात. याशिवाय, ब्लॅक कॉफीमध्ये कॅफिनचे प्रमाण जास्त असते, ज्यामुळे झोपेमध्ये अडथळा येऊ शकतो. जर ते रात्री उशिरा सेवन केले तर ते झोपेच्या पद्धतीत अडथळा आणू शकते. यामुळे निद्रानाशाची स्थिती निर्माण होऊ शकते (फोटो सौजन्य – )

ब्लॅक कॉफीमुळे काय होते

ब्लॅक कॉफीमुळे नक्की काय त्रास सहन करावा लागतो

ब्लॅक कॉफीमध्ये कॅफिनचे प्रमाण जास्त असते, जे शरीरात अ‍ॅड्रेनालाईनचे स्राव वाढवते. त्याच्या जास्त डोसमुळे काही लोकांमध्ये चिंता, चिंता किंवा अस्वस्थता यासारखे दुष्परिणाम होतात. ज्यांना आधीच चिंता विकार आहे त्यांच्यासाठी ब्लॅक कॉफीचे जास्त सेवन अधिक हानिकारक आहे. ब्लॅक कॉफीचे जास्त सेवन केल्याने कॅल्शियम शोषणावर परिणाम होऊ शकतो, ज्यामुळे हाडांची घनता कमी होऊ शकते. यामुळे कालांतराने ऑस्टियोपोरोसिससारख्या समस्या उद्भवू शकतात.

रिकाम्या पोटी कॉफी पिण्याची सवय असेल तर वेळीच थांबा! जाणून घ्या आरोग्याला होणारे तोटे

पचनासंबंधित समस्या

पचनाचे त्रास वाढू शकतात

कॉफीमध्ये उपलब्ध ॲसिड आणि कॅफीन ॲसिडिटी, गॅस आणि पाचन संबंधी इतर समस्या निर्माण करू शकतात. जर तुम्ही आधीपासून या समस्यांनी त्रस्त असाल तर ब्लॅक कॉफी पिणे यामध्ये अधिक त्रास निर्माण करू शकते. जास्त प्रमाणात ब्लॅक कॉफी पिण्याने कॅफिनचे व्यसन लागू शकते, ज्यापासून मुक्त होणे अत्यंत कठीण असते आणि त्यामुळे डोकेदुखी, थकवा आणि चिडचिड यासारख्या समस्या उद्भवू शकतात

गर्भवती महिलांसाठी धोकादायक

गर्भवती महिलांनी पिऊ नये ब्लॅक कॉफी

गर्भवती महिलांनी ब्लॅक कॉफीचे सेवन मर्यादित करावे किंवा ते अजिबात टाळावे कारण जास्त कॅफिनमुळे गर्भातील बाळाच्या विकासावर परिणाम होऊ शकतो आणि गर्भपाताचा धोका वाढू शकतो. गरोदर राहिल्यानंतर तुम्हाला कॉफीची सवय असल्यास डॉक्टर सर्वात पहिले ही सवय बंद करण्यास सांगतात

कॉफी प्यायल्याने कॅन्सरचा धोका कमी होतो का? जाणून घ्या संशोधक काय सांगतात

हृदयासाठीही धोकादायक

हृदयाच्या समस्या असणाऱ्यांनी ब्लॅक कॉफीचे सेवन करणे त्रासदायक

जास्त प्रमाणात कॅफिनमुळे हृदय गती वाढू शकते आणि उच्च रक्तदाबाचा त्रास होऊ शकतो. म्हणूनच हृदयरोगाने ग्रस्त असलेल्या लोकांसाठी ते धोकादायक ठरू शकते. ज्यांना हृदयाचे त्रास आहेत अशा व्यक्तींनी ब्लॅक कॉफी पिणे टाळावे आणि आपल्या आरोग्याची योग्य काळजी घ्यावी

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांच्या सल्ल्यानुसारच योग्य बदलानुसार वापर करावा.

## मजबूत हाडांसाठी थंडीच्या दिवसांमध्ये बनवा 'या' पदार्थांचे पौष्टीक लाडू, नियमित करा सेवन



थंडीच्या दिवसांमध्ये शरीराला पोषक घटकांची आवश्यकता असते. लाडूमध्ये अनेक पोषक घटक आढळून येतात. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला थंडीच्या दिवसांमध्ये शरीराला पौष्टिक असणारे लाडू कसे बनवावे, याची सोपी रेसिपी सांगणार आहोत.

थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्याची जास्त काळजी घेणे गरजेचे आहे. कारण या दिवसांमध्ये साथीचे आजार, हाडांचे दुखणे वाढण्याची शक्यता असते. हाडांचे दुखणे वाढल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. यामुळे अनेक वेदनांना सामोरे जावे लागते. शरीरातील हाडं दुखणे, कंबर दुखणे, पाठ दुखणे, मान दुखणे इत्यादी अनेक समस्या उद्भवू लागतात. या समस्या उद्भवू लागल्यानंतर लवकरात लवकर आराम मिळवण्यासाठी आहारात बदल करणे आवश्यक आहे. शिवाय या ऋतूंमध्ये शरीराला उबदारपणाची आवश्यकता असते. अशावेळी आहारात वेगवेगळ्या प्रकारच्या लाडूचे सेवन करावे. कारण लाडूमध्ये शरीराला आवश्यक असलेले सर्व पदार्थ आढळून येतात. चला तर जाणून घेऊया थंडीच्या दिवसांमध्ये पौष्टिक लाडू बनवण्याची सोपी कृती.(फोटो सौजन्य – )

साहित्य:

मेथी

गव्हाचं पीठ

अळशी

तूप

वेलची पावडर

ड्राय फ्रुट

गूळ

कृती:

लाडू बनवण्यासाठी सर्वप्रथम, कढईमध्ये तूप गरम करण्यासाठी ठेवा. तूप गरम झाल्यानंतर त्यात गव्हाचं पीठ टाकून मंद आचेवर व्यवस्थित भाजून घ्या.

पीठ भाजून झाल्यानंतर त्याच कढईमध्ये काजू, बदाम तुकडे भाजून नंतर अळशीच्या बिया भाजण्यासाठी टाका.

पॅनमध्ये तुम्हा एकदा तूप टाकून त्यात बारीक किसून घेतलेले गूळ टाकून व्यवस्थित वितळवून घ्या. नंतर त्यात आवश्यकतेनुसार वेलची पावडर टाकून मिक्स करा.

नंतर त्यात भाजून घेतलेले सर्व साहित्य घालून मिक्स करा.

तयार मिश्रणाचे छोटे छोटे लाडू वळून घ्या. तयार आहेत सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले पौष्टिक लाडू.

## धक्कादायक! एअरपोर्टजवळ राहणाऱ्या लोकांना हार्ट अटॅकचा धोका; रिसर्चमध्ये विस्फोटक खुलासा

विमानतळांजवळ राहणाऱ्या लोकांना हृदयविकाराचा झटका आणि हृदयाशी संबंधित आजारांचा धोका इतरांपेक्षा जास्त असल्याचे अलिकडच्या एका संशोधनातून समोर आले आहे. काय सांगतो अभ्यास जाणून घ्या





जर तुमचे घर विमानतळाजवळ असेल तर ही बातमी तुमच्यासाठी नक्कीच धक्कादायक ठरू शकते. विमानतळांजवळ राहणाऱ्या लोकांना हृदयविकाराचा झटका आणि हृदयाशी संबंधित आजारांचा धोका इतरांपेक्षा जास्त असल्याचे अलिकडच्या एका संशोधनातून समोर आले आहे. याचे कारण सतत होणारा मोठा आवाज आणि वायू प्रदूषण आहे, ज्याचा हळूहळू हृदयावर वाईट परिणाम होतो. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की हा धोका केवळ वृद्ध लोकांपुरता मर्यादित नाही तर तरुण लोकही याला बळी पडू शकतात.

हे संशोधन ऑक्सफर्ड विद्यापीठाने केले होते, ज्यामध्ये असे आढळून आले की विमानतळाजवळ राहणाऱ्या लोकांच्या शरीरावर हानिकारक आवाज आणि प्रदूषणाचा गंभीर परिणाम होतो. विमानांच्या उड्डाण आणि उतरण्याचा आवाज आणि विमानतळाशी संबंधित वाहतुकीमुळे निर्माण होणारे ध्वनी प्रदूषण यासारखे सततचे मोठे आवाज लोकांच्या हृदयावर थेट परिणाम करतात. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की २४ तास सतत आवाजाच्या संपर्कात राहिल्याने मानवी शरीरावर ताण येतो. यामुळे रक्तदाब वाढतो आणि हृदयावर दबाव येतो. या स्थितीमुळे दीर्घकाळात हृदयविकाराचा झटका येऊ शकतो (फोटो सौजन्य – )

वायू प्रदूषणाचाही धोका

विमानतळाजवळ राहणाऱ्या लोकांना केवळ ध्वनी प्रदूषणच नाही तर वायू प्रदूषणाचाही सामना करावा लागतो. विमानाच्या इंजिनांमधून आणि आजूबाजूच्या वाहतुकीतून निघणारा धूर हवा विषारी बनवतो. ही विषारी हवा फुफ्फुसे आणि हृदय दोघांसाठीही धोकादायक आहे. अशा हवेत जास्त वेळ राहिल्याने शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते आणि हृदयरोगांचा धोका वाढतो.

काय सांगतो रिसर्च

या अभ्यासात, हजारो लोकांच्या आरोग्याचे निरीक्षण करण्यात आले आणि विमानतळाजवळ आणि विमानतळापासून दूर राहणाऱ्या लोकांमध्ये तुलना करण्यात आली. निकालांवरून असे दिसून आले की विमानतळापासून १० किलोमीटरच्या आत राहणाऱ्या लोकांना हृदयविकाराचा धोका २०% जास्त असतो. त्यामुळे तुम्ही एअरपोर्टच्या जर इतक्या जवळ रहात असाल तर नक्कीच तुम्हाला हा अहवाल विचार करायला लावेल.


तज्ज्ञांनी काय सांगितले

रात्रीच्या वेळी विमानांच्या आवाजात ज्या प्रकारच्या असामान्यता आढळल्या त्यामुळे हृदयरोग आणि स्ट्रोकचा धोका वाढू शकतो आणि याबद्दल आम्हाला काळजी वाटते असे युनिव्हर्लिटी ऑफ लेन्सेस्टरमधील प्राध्यापिका ॲना हॅन्सलने सांगितले. रात्रीच्या वेळी विमानांच्या आवाजामुळे झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होतो आणि आरोग्यावर परिणाम करणारा हा एक महत्त्वाचा घटक असू शकतो असेही त्यांनी सांगितले.

हृदयाच्या आरोग्यावर आवाजाची भूमिका सध्या तपासली जात आहे. तथापि, तुमच्या हृदयाची काळजी घेण्याचे अनेक स्थापित मार्ग आहेत. यामध्ये निरोगी आणि संतुलित आहार घेणे, शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणे, निरोगी वजन राखणे, धूम्रपान करत असल्यास धूम्रपान सोडणे, मद्यपान कमी करणे, उच्च रक्तदाब आणि मधुमेह यासारख्या परिस्थिती नियंत्रणात ठेवणे आणि डॉक्टरांनी लिहून दिल्यास कोलेस्टेरॉल कमी करणारी औषधे घेणे यांचा समावेश आहे. असेही त्यांनी अभ्यासात म्हटलं आहे.

## गुडघ्यापर्यंत लांब केसांसाठी 'हा' घरगुती उपाय नक्की करून पहा, एका रात्रीत केस होतील काळेभोर

केसांच्या वाढीसाठी कोरफड जेलचा या प्रकारे वापर केल्यास केसांची वाढ चांगली होते. कोरफड जेलमध्ये अनेक गुणधर्म आढळून येतात. शिवाय कोरफड जेलमध्ये हे पदार्थ मिक्स करून लावल्यास केसांची वाढ चांगली होते.



सर्वच महिलांना लांबलचक सुंदर केस हवे असतात. लांब केस वाढवण्यासाठी महिला सतत काहींना काही उपाय करतात. मात्र वातावरणात होणाऱ्या बदलांमुळे केसांची गुणवत्ता खराब होऊन जाते आणि केस कोरडे निस्तेज होऊन जातात. केसांची गुणवत्ता टिकवून ठेवण्यासाठी केसांना पोषण देणे आवश्यक आहे. शिवाय दैनंदिन आहारात केसांच्या वाढीस आवश्यक असलेल्या घटकांचे सेवन केल्यास केसांची वाढ निरोगी होते. थंडीच्या दिवसांमध्ये अनेक महिला केसांवर वेगवेगळ्या केमिकल ट्रीटमेंट करून घेतात. मात्र याचा फारसा परिणाम केसांवर दिसून येत नाही. काही दिवस खूप सुंदर आणि सिल्की दिसतात. मात्र काही महिन्यांनंतर केस पुन्हा एकदा कोरडे आणि निस्तेज होऊन जातात. केसांच्या वाढीसाठी केसांची योग्य निगा राखणे आवश्यक आहे.(फोटो सौजन्य – ळडींलज्ञ)

केसांची काळजी घेण्यासाठी महिला सतत काहींना काही करत असतात. केसांच्या निरोगी वाढीसाठी केसांना आठवड्यातून दोनदा तेल लावणे, केसांना सूट होईल अशा शॅम्पूचा वापर करणे, हेअर मास्क लावणे, आहारात पौष्टिक पदार्थांचे सेवन करणे इत्यादी अनेक गोष्टी केल्या जातात.मात्र केसांच्या वाढीसाठी शरीराला आतून पोषण देणे आवश्यक आहे. आज आम्ही तुम्हाला केसांच्या वाढीसाठी कोरफडचा वापर कसा करावा, याबद्दल सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

केसांना कोरफड लावण्याचे फायदे:

केसांच्या वाढीसाठी केमिकल गोष्टींचा वापर करण्याऐवजी घरगुती पदार्थांचा वापर करावा. यासाठी कोरफड वापरावे. कोरफड केसांना लावल्यामुळे केसांची गुणवत्ता कायम टिकून राहते. शिवाय केस हायड्रेट आणि स्वच्छ राहतात. तसेच यामध्ये अँटी-ऑक्सिडेंट, अँटी-इंफ्लेमेटरी आणि अँटी-बॅक्टेरियल गुणधर्म आढळून येतात. ज्यामुळे केसांच्या अनेक समस्या दूर होण्यास मदत होते. कोरफडमध्ये असलेले विटामिन ए आणि ई त्वचेच्या आरोग्यासाठी सुद्धा अतिशय फायदेशीर आहे. कोरफडमध्ये कांद्याचा रस मिक्स करून लावल्यास केसांची वाढ मजबूत होईल आणि केस सुंदर दिसू लागतील.

केसांच्या वाढीसाठी कोरफड कांद्याचा रस प्रभावी:

कोरफड आणि कांद्याचा रस मिक्स करून केसांना लावल्यास केसांची वाढ मजबूत होण्यास मदत होईल. यासाठी वाटीमध्ये कोरफड जेल घेऊन त्यात कांद्याचा रस टाकून मिक्स करून घ्या. त्यानंतर तयार केलेले मिश्रण केसांच्या मुळांपासून टोकांपर्यंत सगळीकडे व्यवस्थित लावून घ्या ३० मिनिटं ठेवून नंतर केस पाण्याने स्वच्छ धुवा. यामुळे केसांची चमक कायम तशीच टिकून राहील.

वातावरणात सतत होणाऱ्या बदलांमुळे केसांमध्ये कोंडा होऊन केसांवरील त्वचा तेलकट आणि चिकट होऊन जाते. केस कितीही स्वच्छ केले तरीसुद्धा केस तेलकटच लागतात., अशावेळी कोरफड जेलमध्ये लिंबाचा रस टाकून मिश्रण तयार करून घ्या. तयार केलेले मिश्रण टाळूवर व्यवस्थित लावून ३० मिनिटं मसाज करून घ्या. त्यानंतर पाण्याने केस स्वच्छ धुवा. हा उपाय केल्यामुळे केसांतील कोंडा कमी होऊन टाळू स्वच्छ होईल आणि केस सुंदर दिसतील.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही.

# खासगी व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची लूट

## हंगाम संपायला आला तरी कापूस खरेदीसाठी सीसीआयला मिळाला नाही मुहूर्त ?

**:सर्वाधिक पेरा असलेल्या कापसाचे सीसीआयने कापूस खरेदी केंद्र सुरू केले नाही, त्यामुळे खासगी व्यापारी कमी भावाने खरेदी करून शेतकऱ्यांची लूट करू लागले आहेत. किनवटचे कापूस खरेदी केंद्र सुरू करायला सीसीआयला अद्यापही मुहूर्त सापडला नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. कापूस खरेदी करण्यासाठी सीसीआय अपयशी ठरल्याने खासगी व्यापाऱ्यांना हमीभावापेक्षा कमी भावाने विक्री करावी लागली. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई म्हणून शासनाने कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल एक हजार रुपये देण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.**



किनवट/शेख शौकत :–केंद्र शासनाच्या आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत एनसीसीएफच्या माध्यमातून नाफेडची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वतीने नगदी पीक म्हणविल्या जाणाऱ्या सोयाबीनची १० हजार ५७० क्विंटल खरेदी करण्यात आली आहे. ६६० शेतकऱ्यांच्या मालाची तोलाई झाली आहे. मात्र, पांढरे सोने असलेल्या कापसाचा हंगाम संपत आला तरी सीसीआयने खरेदी केंद्रे सुरू केली नसल्याने शेतकऱ्यांच्या घरात कापूस पडून आहे. गरजवंत शेतकऱ्यांचा कापूस खासगी व्यापारी हमीभावापेक्षा कमी दराने खरेदी करून मोकळा होत असल्याचे चित्र आहे. तर काही कापूस तेलंगणाच्या आदिलाबाद येथे खासगी वाहनाने जाताना दिसत आहे. जगाचा पोशिंदा म्हणविला जाणारा शेतकरी आजही उपेक्षित आहे. अतिवृष्टी, पूरपरिस्थितीचा मार आणि खरीप हंगामातील घटलेले उत्पन्न यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला असताना जो माल शेतकऱ्यांच्या घरात आला तो मालही हमीभावाने खरेदी करण्यासाठी शासन अपयशी ठरले आहे. किनवट तालुक्याचे मुख्य पीक कापूस असून, दुय्यम पीक सोयाबीन आहे. यावर्षी सोयाबीन असो किंवा कापूस असो उतारा प्रचंड घटला आहे. नाफेडची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून ४ हजार ८९२ रुपये प्रति क्विंटल दराने सोयाबीन खरेदी सुरू आहे. त्यातही बारदाना उपलब्ध करून देण्यात येत नसल्याने खरेदी रेंगाळत आहे. सोयाबीन उत्पादक २ हजार ७५ शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी झाली. त्यापैकी ७०६ शेतकऱ्यांना मेसेज आला आहे. ६६० शेतकऱ्यांची १० हजार ५७० क्विंटल खरेदी झाली. ५ कोटी १७ लाख ८ हजार ४४० रुपयांचे सोयाबीन खरेदी करण्यात आले आहे.

# डॉ. रत्नाकर गुट्टे यांचा पूर्णा शहरात भव्य नागरी सत्कार सोहळा व सुभाष देसाई यांची पूर्णा तालुकाध्यक्षपदी निवड





पूर्णा / प्रतिनिधी :– ७ जानेवारी २०२५ रोजी गंगाखेड विधानसभेचे आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे हे सलग दुसऱ्यांदा मोठ्या मताधिक्याने विजयी झाल्याबद्दल पूर्णा शहरातील सुमन मंगल कार्यालयात भव्य नागरी सत्कार सोहळा आयोजीत करण्यात आले होते. या सत्कार सोहळ्याचे आयोजन गुट्टे काका मित्रमंडळ, राष्ट्रीय समाज पक्ष, व महायुती च्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या वतीने करण्यात आले होते . सत्कार सोहळ्याच्या वेळी महायुतीतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. यावेळी पूर्णा शहरातून आमदार गुट्टे यांची भव्य रॅलीही काढन्यात आली. व यावेळी सुमन मंगल कार्यालयात आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे (काका) मित्र मंडळाच्या पूर्णा तालुकाध्यक्ष पदी सुभाष पांडुरंग देसाई यांची नियुक्ती चे पत्र आमदार डॉक्टर रत्नाकर गुट्टे यांच्या हस्ते देण्यात आले.चुडावा येथील गावकरी यांनी यावेळी त्यांना अभिनंदन व शुभेच्छा दिल्या.



## रेखाताई गोदाम (आरकडे) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ शालेय साहित्य व खाऊचे वाटप

केज/प्रतिनिधी –स्व. रेखाताई गोदाम (आरकडे) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्यांचे जेष्ठ चिरंजीव धनंजय गोदाम व पत्नी सोनल यांनी आईने शिक्षण घेतलेल्या बोरगाव (बु) येथील जि. प. शाळेत दि. ६ रोजी विद्यार्थ्यांना तिन डझन लेझीम व सर्व विद्यार्थी यांना खाऊचे वाटप करून स्मृतीशेष आईच्या स्मृतिप्रीत्यर्थ अभिवादन केले. या विशेष कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून शाळेचे मुख्याध्यापक देशमुख एस. बी. प्रमुख पाहुणे म्हणून मेजर संग्राम आरकडे , पत्रकार विजय आरकडे तसेच साकरबाई आरकडे, प्रभावती आरकडे, कविता गायकवाड, स्मिता आरकडे, मनिषा आरकडे, भैय्यासाहेब आरकडे, रोहीत गायकवाड, जयश्री गायकवाड, योगेश आरकडे, बोरगाव (बु ) शाळेचे शिक्षक वृंद गिरी सर, पठाण सर, सागरे सर कुदळे मॅडम, देखने मॅडम, धपाटे मॅडम व सर्व विद्यार्थी यांची उपस्थिती होती. धनंजय गोदाम व पत्नी सोनल हे मुंबई येथे वास्तव्यास आहेत. परंतू प्रत्येक वर्षी दि. ६ जानेवारी रोजी आईचा जन्मदिवस हा स्मृती दीन म्हणून साजरा करतात. त्यांच्या या उपक्रमाचे बोरगाव ( बु) येथील गावकरी, नातेवाईक यांनी त्यांचे कौतुक केले आहे.

# जनविकास परिवर्तन आघाडीच्या जाहीरनाम्यातील वचनपूर्ती कडे वाटचाल-हारुणभाई इनामदार



के ज / प्रतिनिधी – के ज – कळंब रोड लगत शहरातील प्रभाग ८ मधील रस्ते नाली बांधकामासह विविध विकास कामाचे श्रीफळ फोडून उद्घाटन करून प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात आली आहे. माध्यमाशी बोलताना जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार यांनी सांगितले की, केज नगरपंचायत च्या निवडणुकीच्या वेळी जनविकास परिवर्तन आघाडीने जाहीरनामेच्या माध्यमातून दिलेले वचन आम्ही आज रोजी पूर्ण करत आहोत व त्या वचनपूर्ती कडे वाटचाल करीत आहोत. प्रभाग क्रमांक आठ मधील रस्ते नाली च्या कामासह विविध कामे गेल्या अनेक वर्षापासून अद्यापही झालेली नव्हती या भागामध्ये नागरिक मोठ्या प्रमाणामध्ये रहिवास करत आहेत. निवडणुकीच्या वेळी जनविकास परिवर्तन आघाडीने या भागातील नागरिकांना शब्द दिला होता की, केज नगरपंचायत च्या माध्यमातून आमची सत्ता आल्यानंतर आम्ही या भागातील विकास कामे करू त्याचाच एक भाग म्हणून केज–कळंब रोडवरील हॉटेल लोकसेवा पासून जुना चिंचोली रस्त्याचे व नालीच्या बांधकामासह या भागातील अनेक रस्ते व विविध विकास कामाची श्रीफळ फोडून सुरुवात करण्यात आली आहे. केज नगरपंचायतच्या माध्यमातून या भागातील विकास कामे मंजूर करून आणून कामास सुरुवात केल्याबद्दल जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार, नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेवक जलालभाई इनामदार यांचा या भागातील नागरिकांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. कामाचा शुभारंभ उपस्थित मान्यवर व या भागातील नागरिक यांच्या हस्ते श्रीफळ फोडून प्रत्यक्षात कामास सुरुवात करण्यात आली. यावेळी बोलताना इनामदार म्हणाले की, आम्ही केज शहराच्या विकास कामासाठी कटिबद्ध आहोत व आमच्या जनविकास परिवर्तन आघाडीने निवडणुकीच्या वेळी दिलेल्या जाहीरनाम्याप्रमाणे आम्ही केज वासियांची सेवा करण्यासाठी कटिबद्ध आहोत. येणाऱ्या काळातही या भागातील उर्वरित कामे आम्ही लवकरच मार्गी लावू असे बोलताना इनामदार यांनी सांगितले आहे. यावेळी बोलताना नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड म्हणाल्या की, प्रभाग क्रमांक आठ हा गेल्या अनेक दिवसापासून विकास कामापासून वंचित होता परंतु जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून केज नगर पंचायतची सत्ता आमच्या हाती येताच या भागातील अनेक कामे मार्गे लावण्यासाठी प्रयत्न केले. या भागात अनेक ठिकाणी रस्ते नाल्या सह विविध कामे आम्ही पूर्णतत्त्वाकडे घेऊन जात आहोत आज रोजी या भागात अनेक कामे पूर्ण झालेले आहेत. यापुढेही उर्वरित या भागातील राहिलेले कामे लवकरच पूर्ण करणारा आहोत असे त्यांनी उपस्थितू अश्वशित केले आहे.

यावेळी जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार,नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड, गटनेते राजूभाई इनामदार,नगरसेवक जलालभाई इनामदार, जनविकास सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष रमेश भिसे, खाजाभाई तांबोळी, बशीरभाई इनामदार, फिरोज टेलर, रसूल टेलर, फारूक इनामदार, मुझे पठाण, ड. वसिम शेख, नखाते मेजर, सय्यद सलीम, विवेक बनसोड, बप्पा लांडगे, आखिब शेख, जमलोदिन फारुखी, नौशाद शेख यांच्यासह जनविकास परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी कार्यकर्ते व या भागातील नागरिक उपस्थित होते.

## मराठी पत्रकार परिषदेच्या सदस्या पत्रकार श्रीमती गितांजली लव्हाळे मॅडम यांचा सत्कार संपन्न



वडवणी/प्रतिनिधी–बीड जिल्ह्यातील वडवणी येथील तालुका मराठी पत्रकार परिषदेच्या पत्रकार गितांजली लव्हाळे मॅडम यांना मैत्रा फाउंडेशन महाराष्ट्र बीड यांच्या वतीने शिक्षण महर्षी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला.. यानिमित्ताने त्यांचा यथोचित सत्कार सन्मान करुन शुभेच्छा देताना नगराध्यक्ष शेषेराव जगताप पाटील, युवा नेते महादेव जमाले पाटील, जेष्ठ नागरिक बालुभाऊ शिंदे पाटील,हरी मन्नु राठोड,डिजिटल मिडिया परिषदेचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे, युवा नेते अशोकराव गोंडे,माजी नगरसेवक आत्माराम जमाले पाटील, वडवणी तालुका मराठी पत्रकार परिषदेचे जेष्ठ मार्गदर्शक पत्रकार सुधाकरराव पोटभरे,तालुका अध्यक्ष पत्रकार सतिश सोनवणे सह आदी दिसत आहेत.

## श्रम संस्कारातून तरुणांचा व्यक्तिमत्व विकास शक्य – प्रा. डॉ. केशवाल अलगुले

बाभळगाव : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा आणि ग्रामीण जीवनाचा स्नेह वाढवा या अनुषंगाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष युवक शिबिराचे आयोजन केले जाते. सात दिवस विद्यार्थी आपली स्वतःची कामे स्वतः करीत असतो. गावातील लोकांसोबत तो स्नेहभावनेने राहून तेथील जनजीवन समजून घेतो. संस्कार आणि श्रम यातून त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो. असे प्रतिपादन राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. केशव अलगुले यांनी केले.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित सात दिवशीय निवासी राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर मौजे धनेगाव येथे संपन्न झाले. त्याच्या समारोप प्रसंगी डॉ. अलगुले बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.दुष्यंत कटारे होते. राष्ट्रीय सेवा योजना विशेष शिबीर केलेल्या तरुणाच्या अंगामध्ये राष्ट्रभावना, लोकशाही मूल्य आणि सामाजिक भान निर्माण होते. अशा शिबिरातून तरुणाच्या अंगातील नेतृत्व गुण विकसित होऊन तो समाजासाठी आदर्श ठरतो. समाजातील त्याच्या सामाजिक व्यवहारातून तो ठळक अनुभवास येतो. आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो ही भावना त्याच्या अंगी वृद्धिंगत होते. असे अध्यक्ष स्थानावरून बोलताना ते म्हणाले.

प्रारंभी महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस अभिवादन, दयानंद विद्यालय बाभळगाव येथील माजी शिक्षक भगवान भारती या शिक्षकास श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमास प्रारंभ झाला. कार्यक्रमास दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव सदस्य मारुती मस्के व शालेय समितीचे अध्यक्ष प्रशांत हाळे यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ.दशरथ भिसे यांनी केले. यावेळी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रा. डॉ. राजेश्वर खाकरे व मुख्याध्यापक सविता धर्माधिकारी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन विद्यार्थी प्रतिनिधी ओंकार सुरवसे यांनी केले. शुभ रात्रीच्या वतीने अभिषेक सौदागर, रितेश बोयणे, ऐश्वर्या भोसले यांनी शिबिरातील अनुभव कथन केले तर आभार सहकार्यक्रमाधिकारी डॉ.अंगद कोते यांनी मानले.

कार्यक्रमाला डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ.जयदेवी पवार, डॉ. माधव गायकवाड, डॉ.सुरेशकुमार कांबळे, डॉ. महावीर कटके, डॉ.अभिजीत बादाडे, डॉ. अभिजीत बादाडे, डॉ. पांडुरंग मुंढे, डॉ.मीनाक्षी कोंगे, प्रा. पवार डी.एम. , प्रा. महारुद्र बिडवे, प्रा. संतोष कल्याणकर यांची

# सात कलमी कृती कार्यक्रमाचा सर्वसामान्य नागरिक केंद्रबिदू !

## प्रत्येक विभागाने नागरिकांचे जीवन सुकर करण्यासाठी

लातूर, दि. ०९ : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन सुकर होण्यासाठी अर्थात ईज ऑफ लिव्हिंगसाठी सात कलमी कृती कार्यक्रमाची घोषणा केली आहे. सर्वसामान्य नागरिक केंद्रबिदू असलेल्या या कृती कार्यक्रमाची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी नियोजनबद्ध आणि समन्वयाने काम करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर–घुगे यांनी आज येथे दिल्या. पुढील शंभर दिवसात राबवायच्या सात कलमी कृती कार्यक्रमाच्या अनुषंगाने आयोजित सर्व शासकीय विभागांच्या जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत त्या बोलत होत्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, सार्वजानिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता डॉ. सलीम शेख, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांच्यासह सर्व तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे या बैठकीला उपस्थित होते.

राज्यात प्रशासनाला येत्या शंभर दिवसांत प्राधान्याने करावयाची कामे याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांवर काय कार्यवाही केली, याबाबत १५ एप्रिल २०२५ रोजी आढावा घेतला जाणर आहे. आपल्या कार्यालयाचे संकेतस्थळ सुसज्ञ करणे, माहिती अधिकार कायद्यानुसार मागितली जाईल अशी सर्व माहिती अगोदरच संकेतस्थळावर उपलब्ध करून देणे, संकेतस्थळ सायबरदृष्ट्या सुरक्षित करणे, शासकीय कार्यालयांची स्वच्छता करणे, अनावश्यक कागदपत्रे काढून टाकणे, खराब आणि वापरात नसलेली वाहने निर्लेखित करणे, शासकीय कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी पिण्याचे पाणी, प्रसाधनगृह स्वच्छ राहतील, हे सुनिश्चित करणे आदी बाबींचा या सात कलमी कृती कार्यक्रमात समावेश असल्याचे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर–घुगे यांनी सांगितले.

नागरिकांचे जीवन सुकर होण्यासाठी प्रत्येक विभागाने किमान दोन सुधारणा, नाविन्यपूर्ण उपक्रम आपल्या कार्यालयात राबवावेत. पुढील शंभर दिवसात प्रलंबित कामांची संख्या शून्यावर आणण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्न करावेत. तालुका व जिल्हा स्तरावरील सर्व अधिकारी दर सोमवार, मंगळवार या दोन दिवशी नागरिकांसाठी आपापल्या कार्यालयात उपलब्ध राहतील. नागरिकांचे स्थानिक पातळीवर सुटू शकणारे प्रश्न, समस्या तालुका स्तरावरच सोडवावेत.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE